**नियमित दिवाणी दावा क्र. १२२/२०२३**

**नारायण विरुध्द अविनाश**

**CNR:MHSN14-000673-2023**

## नि.क्र. २० वरील आदेश

१. प्रतिवादी नं. १, २, ४ ते ६ तर्फे प्रस्तुतचा अर्ज दाव्याचे कामी कैफियत व म्हणणे दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्यांचेविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून कैफियत व म्हणणे दाखल करुन घेणेची विनंती केलेली आहे. प्रतिवादीतर्फे असे कथन केले आहे की, वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे. दाव्यातील प्रतिवादी हे कायमस्वरुपी मुंबई व बाहेरगावी नोकरी व कामधंद्यानिमित्त राहणेस आहेत. त्यामुळे दाव्याचे कामी कैफियत व म्हणणे दाखल करणेकरिता आवश्यक असणारी कागदपत्रे व माहिती वेळेत जमा करुन वकीलांना देणे प्रतिवादी यांचे व्यापामुळे शक्य झाले नाही. प्रतिवादी हे शेतकरी कुटूंबातील असून त्यांना मुदतीच्या कायद्याची पुरेशी माहिती नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना वेळेत मे. कोर्टामध्ये वादीच्या दाव्यास कैफियत व म्हणणे दाखल करु शकले नाहीत. प्रतिवादींविरुध्द विना कैफियत व म्हणणे असा झालेला हुकूम रद्द न झालेस प्रतिवादी यांचेवर अन्याय होणार असून त्यांचे पैश्याच्या स्वरुपात कधीही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे व दाव्याचे कामी गुंतागुंत निर्माण होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत व म्हणणे दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्यांचेविरुध्द दावा विना कैफियत व म्हणणे असा झालेला हुकूम रद्द करुन कैफियत व म्हणणे रेकॉर्डवर घेणेची विनंती केलेली आहे.

२. वादींतर्फे प्रतिवादी नं. ३ चे नि.क्र. २६ अर्जावर दिलेले म्हणणे प्रस्तुत अर्जासाठी वाचणेत यावे असे म्हणणे दिलेले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी यांचा अर्ज व त्यामधील संपूर्ण कथन खोटे व लबाडीचे असून ते केवळ या अर्जाचे साधवणूकीकरिता केलेले आहे. प्रतिवादी यांनी अर्जामध्ये कथन कलेली विलंबाची कारणे संयुक्तीक नाहीत. तसेच त्यास कोणत्याही कागदोपत्री पुराव्याचा आधार नाही. तसेच प्रतिवादी यांनी मुद्दामहून नेमका किती विलंब झालेला आहे हे अर्जामध्ये नमूद केलेले नाही. त्यामुळे वादीतर्फे अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे. न्यायाचे दृष्टीने अर्ज मंजूर करणे झालेस प्रतिवादी यांना जास्तीत जास्त कॉस्ट करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींचा अर्ज व वादींतर्फे दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादी नं. १, २, ४ ते ६ यांना दि. १०/०८/२०२३ रोजी समन्सची बजावणी नि.क्र. ८ नुसार झाली. प्रतिवादी दाव्याचे कामी दि. १४/०८/२०२३ रोजी विधीज्ञांमार्फत हजर झाले. मात्र पुरेशी संधी देवूनही त्यांनी मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल केले नाही. त्यांचेविरुध्द विना कैफियत व विना म्हणणे आदेश जरी पारीत झालेला नसला तरी कैफियत व म्हणणे देणेकरिताची मुदत संपली आहे. प्रतिवादींनी दि. १९/०१/२०२४ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन सोबत कैफियत व म्हणणे दिलेले आहे. प्रस्तुत अर्जान्वये प्रतिवादी यांनी कैफियत व म्हणणे दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून त्यांचेविरुध्द विना कैफियत व म्हणणे हुकूम रद्द होणेची मागणी केली आहे. प्रस्तुतचा दावा निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचे देखील हक्क हितसंबंध आहेत. त्यामुळे सदरचा विलंब माफ होवून प्रतिवादींना कैफियत व म्हणणे देण्याची संधी देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादीस तशी संधी दिल्यास न्यायदानासाठी त्याचा उपयोग होणार आहे. त्यामुळे उभय पक्षांपैकी कोणाचेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर चालवून निकाली करणेस मदत होणार आहे. मात्र प्रतिवादींतर्फे झालेल्या विलंबाची भरपाई म्हणून प्रतिवादींनी वादींना र.रु. ५००/- कॉस्ट देवून अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. २० मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं. १, २, ४ ते ६ यांना कैफियत व म्हणणे देण्यास झालेला विलंब त्यांनी वादींना र.रु. ५००/- कॉस्ट म्हणून देण्याच्या अटींवर माफ करण्यात येतो.

३. कॉस्ट रक्कम दिलेनंतर प्रतिवादी नं. १, २, ४ ते ६ यांची कैफियत व म्हणणे रेकॉर्डवर घेण्यात यावी.

DESAI VINAYA ATMARAM
Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2024.02.29 12:43:24 +0530

शिराळा (**व्ही. ए. देसाई**)

दिनांक २८/०२/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 28/02/2024 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 28/02/2024 |
| Judgment uploaded on | : | 29/02/2024 |